# उल्हासनगर महापालिकेची अनधिकृत गाळ्यांवर तोडक कारवाई

**उल्हासनगर, दि. १ : प्रतिनिधी**

उल्हासनगर महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने कॅंप २ येथील खेमानी जवळ असलेल्या आझाद नगर परिसरात मोठी कारवाई करत अनधिकृतरित्या उभारलेले तीन गाळे जेसीबीच्या सहाय्याने जमीनदोस्त केले आहेत . ही कारवाई सहाय्यक आयुक्त गणेश शिंपी यांच्या नेतृत्वाखाली पार पडली असुन सदर ठिकाणी मागील काही महिन्यांपासून अनधिकृतपणे गाळे उभारले जात होते. या बाबत स्थानिक नागरिकांकडून वेळोवेळी तक्रारी करण्यात येत होत्या.दरम्यान त्याच ठिकाणी निजाम मंजिल इमारती समोर टप्पी नावाचा भुमाफिया अनधिकृत आर सी सी चे बांधकाम करत आहे . हे भुमाफिया दुसऱ्या इमारतीच्या प्लान मंजुरीचा फलक लावुन बिनधास्त पणे बांधकाम करत आहेत .

दरम्यान महापालिकेच्या या कारवाईमुळे परिसरात अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. स्थानिकांनी या कारवाईचे स्वागत करत प्रशासनाचे आभार मानले.

दरम्यान, प्रभाग समिती चारच्या हद्दीत मात्र अनधिकृत बांधकामे सुरूच असून, प्रशासनाकडून कारवाई टाळली जात असल्याची चर्चा आहे. प्रभाग कार्यालयासमोरच नेताजी चौकात राजा नामक ठेकेदार यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात व्यवसायिक गाळे उभारले जात आहेत. उल्हासनगर कॅम्प ५ मधील बॅरेक नं. १७२० व १८१३ या ठिकाणी देखील अनधिकृत बांधकाम सुरू असून, त्यावर महापालिकेची कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे.आझाद नगर येथील निजाम मंजिल या इमारती समोर सुरु असलेले टप्पी याच्या बांधकामावर कारवाई करण्याची मागणी होत आहे .

"एका भागात कारवाई तर दुसऱ्या भागात दुर्लक्ष – हे दुहेरी धोरण राबवुन समान न्याय द्यावा," अशी मागणी आता नागरिकांनी केली आहे .

# महापालिकेतील अभियंत्यांसह आर्किटेक्टवर ईडीची छापेमारी

**वसई, दि. १ : प्रतिनिधी**

वसई विरार महापालिकेचे निलंबित नगररचना विभागाचे उपसंचालक वाय. एस. रेड्डी यांच्यावर ईडीने छापा टाकून केलेल्या कारवाईत मिळालेल्या माहितीवरून ईडीच्या पथकाने वसई विरारसह मुंबई परिसरात 16 ठिकाणी मंगळवारी सकाळपासून छापेमीर केली. याछापेमारीत रेड्डी यांच्या विभागातील त्यांच्या जवळच्या ठेका अभियंत्यांवरही धाडी टाकण्यात आल्या. तसेच रेड्डींशी संबंधित वसई विरारमधील आर्किटेक्टकडेही छापे मारण्यात आले.

नालासोपारामधील 41 अनधिकृत इमारत प्रकरणात महापालिकेचे निलंबित नगररचना उपसंचालक वाय. एस. रेड्डी यांच्यावरील कारवाईत मिळालेल्या माहितीनंतर हे छापे टाकण्यात आले आहेत. या कारवाईमुळे वसई, विरारमध्ये एकच खळबळ उडाली आहे. ईडीने १४ मे रोजी वसई, विरार महापालिकेचे निलंबित नगररचना उपसंचालक वाय. एस. रेड्डी यांच्या हैदराबाद येथील निवासस्थानासह वसई, विरारमधील १३ ठिकाणी छापे टाकले होते. यावेळी रेड्डी यांच्या घरातून ३२ कोटी रुपयांचे सोने आणि रोकड जप्त केली होती. रेड्डी यांच्याकडे बेहिशोबी मालमत्ता आली कुठून त्याचा ईडी तपास करीत होती. त्या माहितीच्या अनुषंगाने ही




कारवाई करण्यात आली.

सोमवारी अचानक या प्रकरणाशी संबंधित आर्किटेक्टसह

महापालिकेच्या नगररचना (टाऊन प्लानिंग) विभागातील काही ठेका अभियंत्यांच्या घरी छापा टाकण्यात आला आहे. या कारवाईचा अधिकृत तपशील अद्याप ईडीकडून जाहीर करण्यात आलेला नाही. इमारतींना परवानी देण्यासाठी आर्किटेक्टच्या माध्यमातून आर्थिक व्यवहार केला जात असल्याचा आरोप आहे. रोख रकमेऐवजी सोन्याच्या माध्यमातून व्यवहार करण्यात आल्याची चर्चा आहे.

नालासोपारा पूर्व परिसरातील अग्रवाल नगरी येथील ४१ अनधिकृत इमारती जमीनदोस्त केल्यानंतर आता ईडीने या संपूर्ण घोटाळ्याची चौकशी सुरू केली आहे. माजी नगरसेवक सीताराम गुप्ता याने या अनधिकृत इमारती बांधल्या होत्या. याप्रकरणात महापालिकेचे निलंबित नगररनचा उपसंचालक वाय. एस. रेड्डी जबाबदार असल्याची तक्रार माजी नगरसेवक धनंजय गावडे यांनी ईडीकडे केली होती.

## रेड्डींच्या घरी घबाड आणि कागदपत्रे सापडल्याने छापेमारी

ईडीच्या पथकाने १४ मे रोजी वसई, विरार शहरासह १३ ठिकाणी एकाच वेळी छापे टाकून चौकशी सुरू केली होती. याचदरम्यान वसई, विरार महापालिकेचे नगररचना विभागाचे निलंबित उपसंचालक वाय. एस. रेड्डी यांच्या हैदराबाद येथील निवासस्थानीही ईडीच्या अधिकाऱ्यांनी छापेमारी केली होती. या कारवाई रेड्डी यांच्या घरातून सुमारे ८ कोटी ६ लाख रुपये रोख रक्कम आणि २३ कोटी २५ लाख रुपयांचे हिरे जडित दागिने आणि सोने जप्त करण्यात आले. याशिवाय विविध कागदपत्रे जप्त करण्यात आली. त्यासंबंधी सखोल माहिती गोळा करून ईडीने रेड्डींच्या जवळच्या मानल्या जात असलेल्या महापालिकेतील ठेका अभियंत्यांसह आर्किटेक्टवर कारवाईचा बडगा उगारला आहे.

# न्यू इंग्लिश स्कूल सोनाळेतील विद्यार्थिनीचा संशयास्पद मृत्यू

**वाडा, दि. १ : प्रतिनिधी**

वाडा तालुक्यातील न्यू इंग्लिश स्कूल सोनाळे या विद्यालयात एका पाचवीत शिकणा-या विद्यार्थिनीचा 26 जून रोजी मृत्यू झाल्याची घटना घडली असून शिक्षकांच्या हलगर्जीपणामुळे तिचा मृत्यू झाल्याचा आरोप विद्यार्थिनीचे वडील प्रकाश झाटे (39) यांनी केला आहे. सदर मृत्यूची चौकशी करण्याची मागणीही त्यांनी केली आहे. वेदिका झाटे (वय 11) असे त्या दुदैवी मुलीचे नाव आहे.

तालुक्यातील बिलघर या गावात प्रकाश झाटे हे कुटुंबासह राहत असून त्यांना प्रियांका (13) व वेदिका (11)या दोन मुली असून प्रियांका ही सातवीत तर वेदिका ही पाचवीत न्यू इंग्लिश स्कूल सोनाळे येथे शिक्षण घेत होते. त्यांची शाळा रोज सकाळी 10.50 ते सायंकाळी 4.50 वा या वेळेत भरते. त्या रोज सकाळी 10.30 वाजता घरातून पायी चालत जातात व सायंकाळी 5.30 वाजेपर्यंत घरी परत येत असतात.

दि.26 जून रोजी सकाळी 10.30 वाजता या दोन्ही मुली घरून पायी चालत शाळेत गेल्या. साधारण सायंकाळी 4.15 वाजण्याचे सुमारास न्यू इंग्लिश स्कूल शाळेचे शिक्षक मोतीराम नडगे हे वेदिकाला त्यांच्या कारमधून घरी घेऊन आले. त्यावेळी वेदिका ही पूर्णपणे बेशुद्ध होती.याबाबत मोतीराम नडगे यांना कुटुंबियांनी विचारले असता त्यांनी सांगितले की दुपारी 3.30 वाजता मधली सुट्टी झाली तेव्हा तुमची मुलगी वेदिकाला अचानक चक्कर येऊन ती बेशुद्ध



झाली म्हणून मी तिला घरी घेऊन आलो आहे .तेव्हा मुलीच्या पालकांनी शाळेच्या जवळच दवाखाना आहे. तुम्ही माझ्या मुलीला दवाखान्यात का नेली नाही, असे विचारले. त्यावर काही एक उत्तर न देता मोतीराम नडगे निघून गेले होते. त्यानंतर बेशुद्ध अवस्थेत असलेल्या वेदिकेला मोटारसायकलवरून वाडा येथील ग्रामीण रुग्णालयात संध्याकाळी 4.45 वाजता उपचारासाठी नेण्यात आले असता तेथील डॉक्टरांनी तिची तपासणी केली आणि तिला मृत घोषित केले.

वेदिका हिच्यावर वेळेत दवा उपचार केला असता तर मुलीचे प्राण वाचले असते. शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षकांनी दवाउपचार करण्यात उशीर केल्याने मुलीचा जीव गेला असल्याचा आरोप प्रकाश झाटे यांनी केला आहे. शिक्षकांच्या हलगर्जीपणामुळे झालेल्या अकस्मात मृत्यूची चौकशी करण्याची मागणी प्रकाश झाटे यांनी केली आहे.

> यासंदर्भात शाळेचे मुख्याध्यापक वसंत महाले यांच्याशी संपर्क साधला असता वेदिका ही मधल्या सुट्टीत खेळत होती. खेळता खेळता तिला चक्कर आली. त्यानंतर शिक्षकांनी तिला पाणी वगैरे देण्याचा प्रयत्न केला. मात्र तिने पाणी प्याले नाही.वेदिकेने शिक्षकांना घरी घेऊन जाण्यास सांगितले. त्यानंतर शिक्षकाने तिला घरी सोडले. येथून आरोग्य उपकेंद्र हे दीड किलोमीटर अंतरावर आहे.
>
> **- वसंत महाले, मुख्याध्यापक**
>
> याबाबत अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.
>
> **- दत्तात्रेय किंद्रे, पोलीस निरीक्षक , वाडा पोलीस ठाणे**

# उबाठाचे विक्रमगड तालुकाप्रमुख शिंदे गटात

**जव्हार, दि. १ : प्रतिनिधी**

उबाठा गटाचे विक्रमगड तालुका प्रमुख संजय आगिवले यांचा शिवसेनेत प्रवेश केला. त्यामुळे पालघर जिल्ह्यातील ग्रामीण भागात उबाठाला झटका बसला आहे. उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या हस्ते संजय आगिवले यांचा पक्षप्रवेश करण्यात आला. यावेळी मंत्री शंभूराज देसाई, पालघर जिल्ह्याचे सहसंपर्कप्रमुख वैभव संखे यांच्यासह शिवसेना शिंदे गटाचे नेते उपस्थित होते.




जिजाऊ संघटनेचे निलेश सांबरे यांनी नुकताच शिंदे गटात प्रवेश केला आहे. त्यांना उपनेतेपद देण्यात आले आहे. पालघर जिल्ह्यात शिंदे गट मजबूत करण्याची महत्वाची जबाबदारी सांबरे यांच्यावर सोपवण्यात आली आहे.पक्षप्रवेशानंतर सांबरे यांनी आठवड्याभरातच जिल्ह्यातील उबाठाचे प्रमुख पदाधिकारी असलेले विक्रमगड तालुकाप्रमुख संजय आगिवले यांना शिंदे गटात घेऊन झटका दिला आहे.

येत्या काही महिन्यात जिल्ह्यातील जिल्हा परिषदेसह पंचायत समित्या, नगरपालिका आणि नगरपंचायतीच्या निवडणुका होणार आहेत. सांबरे यांच्या निमित्ताने शिंदे गटाला जिल्ह्याच्या ग्रामीण भागात पक्ष बांधणीसाठी मोठी संधी मिळाली आहे.

# बोईसरमध्ये 12 किलो गांजा जप्त झारखंडच्या एका आरोपीला अटक



**बोईसर, दि. १ : प्रतिनिधी**

बोईसर येथे स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत १२ किलो ७८० ग्रॅम गांजा जप्त केला आहे. या प्रकरणात झारखंडमधील रहिवासी असलेल्या ३५ वर्षीय पंजू समरा कुजर याला अटक करण्यात आली आहे.

बोईसरच्या थोडीपुजा परिसरात ही कारवाई करण्यात आली असून, जप्त केलेल्या गांजाची बाजारातील किंमत सुमारे १.२७ लाख रुपये असल्याचा अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे.

पालघर पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेला गुप्त माहिती मिळाली होती की, थोडीपुजा भागात पंजू समरा कुजर हा बेकायदेशीरपणे गांजाची विक्री करत आहे. या माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून छापा टाकला. या कारवाईदरम्यान पोलिसांना १२ किलो ७८० ग्रॅम गांजा जप्त करण्यात यश मिळाले. पंजू कुजर याला तात्काळ अटक करण्यात आली असून, त्याच्याविरुद्ध बोईसर पोलिस ठाण्यात नार्कोटिक ड्रग्स अँड सायकोट्रॉपिक सब्स्टन्सेस (एनडीपीएस) कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पालघरचे पोलिस अधीक्षक यतिश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने यशस्वीपणे पार पाडली. या प्रकरणाचा तपास उपनिरीक्षक महेंद्र गावडे यांच्याकडे सोपवण्यात आला होता . पोलिस सूत्रांनुसार, आरोपी पंजू कुजर हा झारखंडमधून गांजा आणून बोईसर परिसरात त्याची विक्री करत होता का या प्रकरणात आणखी काही जणांचा सहभाग आहे का, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे.

पालघर जिल्ह्यात अंमली पदार्थांच्या तस्करीवर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलिसांकडून सातत्याने कारवाया केल्या जात आहेत. बोईसरसारख्या औद्योगिक क्षेत्रात अंमली पदार्थांचा प्रसार रोखण्यासाठी पोलिसांनी आपली गस्त आणि गुप्तचर यंत्रणा अधिक बळकट केली आहे. या कारवाईमुळे स्थानिक गुन्हे शाखेच्या कार्यक्षमतेचे कौतुक होत आहे.

पोलिस अधीक्षक यतिश देशमुख यांनी सांगितले की, "अंमली पदार्थांच्या तस्करीवर आळा घालण्यासाठी पोलिस यंत्रणा कटिबद्ध आहे. अशा कारवायांमुळे समाजातील नशेच्या विळख्याला आळा बसण्यास मदत होईल."

अटक करण्यात आलेला आरोपी पंजू समरा कुजर याला बोईसर पोलिस ठाण्यात आणण्यात आले असून, त्याची कसून चौकशी सुरू आहे. पोलिसांना संशय आहे की, त्याच्याकडे गांजाचा मोठा साठा आणि त्याचे वितरण नेटवर्क असण्याची शक्यता आहे. यासंदर्भात पोलिसांनी झारखंडमधील त्याच्या संपर्कांचाही तपास सुरू केला आहे. तसेच, जप्त केलेला गांजा कोठून आणला गेला आणि त्याची विक्री कोणाला केली जात होती, याची माहिती गोळा करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

या कारवाईसाठी स्थानिक नागरिकांनी पोलिसांना मोलाची माहिती पुरवल्याचे समजते. पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, अशा बेकायदेशीर गोष्टींची माहिती मिळाल्यास तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा. पालघर पोलिसांनी अंमली पदार्थविरोधी मोहिमेला आणखी तीव्र करण्याचे संकेत दिले आहेत.

सध्या हे प्रकरण एनडीपीएस कायद्यांतर्गत दाखल करण्यात आले असून, उपनिरीक्षक महेंद्र गावडे यांच्या नेतृत्वाखाली तपास पुढे चालू आहे. पोलिसांनी जप्त केलेला गांजा आणि आरोपीच्या चौकशीतून मिळणारी माहिती यावर आधारित पुढील कारवाई केली जाणार आहे. बोईसर परिसरात अंमली पदार्थांच्या तस्करीवर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलिसांची ही कारवाई एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

या घटनेमुळे बोईसर आणि आसपासच्या परिसरात अंमली पदार्थांच्या तस्करीविरुद्ध पोलिसांची कठोर भूमिका पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

# बदलापूर जवळच्या दहागाव नदीत तरुण बुडाला

**बदलापूर, दि. १ : प्रतिनिधी**

बदलापूरच्या दहागाव नदीवर मित्रांबरोबर पार्टी करण्यासाठी आलेला एक तरुण बुडाल्याची घटना घडली आहे.तो खोल पाण्यात बुडाल्याने शोध कार्य सुरू आहे. ही घटना घडून ४ दिवस उलटले तरीही या तरुणाचा शोध लागला नाही. एनडीआरएफचे पथक आणि फायर ब्रिगेडकडून शोधमोहीम सुरू आहे.

बदलापूर जवळच्या दहागाव नदीमध्ये मान्सून पिकनिकसाठी मित्रांसोबत आलेला एक तरुण पाण्यात बुडाला आहे. त्या तरुणाचे नाव आशिष करोतीया असे असून तो बदलापूर पश्चिमेयेथील रहिवासी आहे. आशिष करोतीया हे आपल्या मित्रांसोबत दि.२६ जून रोजी पार्टी करण्यासाठी दहागावच्या नदीवर आले होते. आशिष हे नदीमध्ये पोहण्यासाठी उतरले असता पाण्याचा अंदाज आला नाही व ते नदीत बुडाले. हे त्यांच्या मित्रांना समजतात त्यांना शोधण्यासाठी सलग चार दिवस एनडीआरएफचे पथक आणि फायर ब्रिगेडकडून शोधमोहीम सुरू आहे. मात्र, अजूनही त्याचा शोध लागलेला नाही. आशिष यांचा शोध लागत नसल्याने त्यांच्या कुटुंबाकडून चिंता व्यक्त करण्यात येत आहे.

# भिवंडी वाडा रस्त्यावरील बंद टोलनाक्याची दुरावस्था, अपघात घडण्याची शक्यता

**भिवंडी, दि. १ : प्रतिनिधी**

भिवंडी वाडा मनोर या बीओटी तत्त्वावर विकसित केलेल्या रस्त्यावर सुप्रीम इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी कडून टोल अकारण्यात केली जात होती. परंतु रस्त्याची निगा व दुरुस्ती न केल्याने नागरिकांच्या आक्रोशानंतर ११ ऑक्टोबर २०१९ मध्ये येथील टोल वसुली बंद करण्यात आली.परंतु त्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागा कडून रस्त्याची दुर्दशा सुरू असतानाच या रस्त्यावरील टोल नाके सुद्धा जर्जर दुरावस्थेत आले आहेत.कवाड येथील टोलनाक्यावर



मोठ्या प्रमाणावर झुडप वाढली आहेत.येथील विद्युत पुरवठा बंद असल्याने अनेक वेळा रात्री चालकांना या ठिकाणी अंदाज न आल्याने अपघात झाले आहेत.तर टोलनाक्यावरील छप्परावरील लोखंडी पत्रे सडल्याने अनेक पत्रे पडले आहेत. तर अनेक पत्रे लटकत आहेत. पावसाळ्यात जोरदार वाऱ्याने हे पत्रे एखाद्या दुचाकी चालकावर पडल्यास एखाद्याला जीव गमवावा लागेल.पण याकडे प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे.या ठिकाणी एकदा अपघात घडल्यावर प्रशासनाला जाग येणार का असा सवाल स्थानिक नागरिक विचारत आहेत.


## पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६

कार्यालय : २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३

Email:panvelcorporation@gmail.com

वेबसाईट: www.panvelcorporation.com

जा.क्र. पमपा/मातंवि/२१२४/प्र.क्र. ०८/२३४/२०२५ दिनांक: ०१/०७/२०२५

| अनु.क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव |
| --- | --- | --- |
| १ | निविदा/पमपा/मातंवि/२१२४ /प्र.क्र. ०८/२३४/२०२५-२६ | पनवेल महानगरपालिकेत उभारण्यात येणाऱ्या कॉलसेंटरकरिता Smart TVs व Smartphones घेणेबाबत. |

या निविदेबाबतची विस्तृत माहिती शासनाच्या www.panvelcorporation.com या संकेतस्थळावर दि.०१/०७/२०२५ ते दि.०७/०७/२०२५ रोजी दुपारी ०३.३० वाजे पर्यंत उपलब्ध होईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

जा.क्र. पमपा/ जनसंपर्क./३१२५/प्र.क्र.३०१/३०७/२०२५

दिनांक :- ०१/०७/२०२५

सही/-

उप आयुक्त- (I)

पनवेल महानगरपालिका



**PUBLICATION NOTICE**

**DUE ON 04/08/2025 OR THEREAFTER.**

In The High Court of Judicature at Bombay
Interim Application No. 6675 of 2024 in
Family Court Appeal Stamp No. 6292 of 2024

Petition No. 3031/2016
Judge, 7th Family Court, Mumbai

Jitendra Shihori Rajbhar ..... Appellent

**through Advocate : Rammani G. Upadhyay.**

Versus

Manisha Jitendra Rajbhar & ANR ....... Respondents

To

**R. No.1 : Manisha Jitendra Rajbhar**

**R/AT : 525/2016, G.B.B.S.D. Nadar Welfare Society, Opposite Mushkurahat Building, Babrekar Nagar, Kandivali (West), Mumbai - 400067.**

**&**

**Also having Address At A Room At Ganesh Nagar, Petrol Pump, Khan Gali, Kandivali (West), Mumbai - 400066.**

Applicant has made an application to this court as mentioned in the copy of the interim Application.

Delay caused in preferring Family Court Appeal may be condoned etc.

The said application came up for hearing in the court on the 15/03/2024 and as ordered therein, you are given notice that this application shall be placed on board for first hearing/final disposal (order) in this court on the 04/08/2025 or thereafter at that time, you, either in person or through your advocate of this court, appear in this court and show cause as to why the order as per the application of the applicant should not be passed. If you fail to appear and show cause as aforesaid, order as per application of the applicant or as may be deemed fit and proper will be passed.

Witness SHRI. DEVENDRA KUMAR UPADHYAYA & SHRI. ALOK ARADHE, Chief Justice at Bombay aforesaid this 15th day of March, 2024 & 12th day of April, 2024 & 14th day of November, 2024 & 07th day of February, 2025.

**Clerk**
**Section Officer**

**By order of the Court**
**for Deputy Registrar**



## कुळगांव बदलापूर नगरपरिषद

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

नवीन प्रशासकीय ईमारत, म. गांधी चौक रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व) कुळगांव, पिन-४२१५०३, ता.अंबरनाथ जि.ठाणे.

ईमेल:- coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in. वेबसाईट:- https://kbmc.gov.in

जा.क्र : कुबनप/ई-गव्ह/१९८/२०२५-२६ दिनांक:- ३०/०६/२०२५

कुळगांव बदलापूर नगरपरिषदेचे कामकाज हे महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती, व औद्योगिक नागरी अधिनियम १९६५ तसेच राज्यशासन व केंद्र शासनाकडील विविध शासन निर्णय, आदेश यानुसार करण्यात येते. त्यानुसार निवडणूक विषयक कामकाज करणेकरिता एजन्सी नियुक्त करणेकरिता महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडून २४/०६/२०२५ ते दि. ३०/०६/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत दरपत्रक मागविण्यात आले होते. तथापी योग्य प्रतिसाद न मिळाल्याने सदर निविदेस दि.०२/०७/२०२५ रोजी दुपारी तीन वाजेपर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. तसेच सदरची निविदा दि.०३/०७/२०२५ रोजी दुपारी तीन वाजल्यानंतर अथवा प्रशासकीय सोईनुसार उघडण्यात येईल.

सही/-

मुख्याधिकारी

कुळगांव बदलापूर नगरपरिषद

कुळगांव


# वसईत 97 अनधिकृत शाळा सुरुच

## प्रशासनाच्या आशिर्वादाने शिक्षणमाफिया मोकाट

**वसई, दि. १ : प्रतिनिधी**

वसई तालुक्यात यंदा ९७ शाळा सुरु झाल्या असून त्यात ६९ प्राथमिक आणि २८ माध्यमिक शाळांचा समावेश आहे. वसई पंचायत समितीमधील शिक्षण विभाग आणि महापालिका प्रशासनाच्या आशिर्वादाने याशाळा सुरु झाल्याने शिक्षणमाफिया मोकाट झाले आहेत.

वसई विरारमध्ये अनधिकृत बांधकाम जोरात असून त्यात रहिवाशी, औद्योगिक, व्यापारी बांधकामांसोबतच आता अनधिकृत शाळा देखील या अनधिकृत बांधकामांचा अविभाज्य भाग ठरले आहे. अनधिकृत चाळी, रहिवाशी इमारती याठिकाणी शाळांना प्रशासनाकडून परवानगी दिल्या जात आहेत. यात बहुतांश शाळा या परवानगी न घेता सुरू करण्यात आल्याचे दिसत आहे. गेल्यावर्षी शिक्षण विभागाने प्रसिद्ध केलेल्या यादीत एकूण ६९ शाळा अनधिकृत असल्याचे दिसून आले होते. तरी यंदा यात कमालीची भर पडली असून एकूण ९७ शाळा अवैध असल्याचे प्रसिद्ध झालेल्या आकडेवारीनुसार समोर आले आहे. या शाळा अनधिकृत असताना त्यांच्यावर केवळ कागदोपत्री गुन्हे दाखल केले जातात. परंतु, निष्कासन कारवाई करण्यात वसई




विरार शहर महानगरपालिका व शिक्षण विभाग दुर्लक्ष करत असल्याने अनेक गोरगरीब विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य धोक्यात आले आहे.

धक्कादायक बाब म्हणजे कायम विनाअनुदानित शाळा सुरू करून त्यात विद्यार्थ्यांना प्रवेश देऊन विनाप्रशिक्षित शिक्षकांची खोगीरभरती करून विद्यार्थ्यांना शिक्षणाचे धडे दिले जात आहेत. अशा पद्धतीच्या गैरप्रकारांना उत्तेजन देऊन त्यात शेकडो सर्वसामान्य घरातील विद्यार्थ्यांचा जीव व शैक्षणिक भविष्य धोक्यात आले आहे. वसईचा शिक्षण विभाग आणि महापालिका प्रशासन यांच्या अर्थपूर्ण युतीमुळे शिक्षणमाफियांनी शिक्षणाचा बाजार मांडल्याचे विदारक आणि चिंताजनक चित्र सध्या वसईत पहावयास मिळत आहे.

वसई तालुक्यात अनधिकृत शाळांची संख्या दिवसागणिक वाढतच चालली आहे. जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडून दरवर्षी अनधिकृत शाळांची यादी जाहिर करून त्यात पालकांनी पाल्यांना प्रवेश घेऊ नये, असे जाहिर आवाहन करून हात झटकले जात असल्याचे पुन्हा एकदा समोर आले आहे. यंदा तालुक्यात ६९ प्राथमिक आणि २८ माध्यमिक अनधिकृत शाळा सुरु झाल्या आहेत. अनधिकृत शाळांवर कडक कारवाई केली जात नसल्याने अशा शाळांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भविष्याचा गंभीर प्रश्न निर्माण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

दरम्यान, अनधिकृत शाळा आणि अनधिकृत इमारतीत सुरु असलेल्या शाळांच्या बाहेर ठळकपणे शाळा आणि इमारत अनधिकृत असून त्यात विद्यार्थ्यांनी प्रवेश घेऊ नये, असे सूचना फलक लावण्याची सक्ती करण्यात आली असतानाही तसे फलक न लावता विद्यार्थ्यांना प्रवेश देऊन फसवणुक केली जात असल्याचेही दिसत आहे.

# आगाऊ आरक्षण करणाऱ्या प्रवाशांना तिकीट दरामध्ये 15% सूट

**भाईंदर, दि. १ : प्रतिनिधी**

एसटीच्या लांब व मध्यम पल्ल्याच्या (१५० किलोमीटरपेक्षा जास्त) प्रवासासाठी आगाऊ आरक्षण करणाऱ्या पुर्ण तिकीटधारी (सवलतधारक प्रवासी वगळून) प्रवाशांना तिकीट दरात १५ टक्के सवलत दिली जाणार आहे. ही योजना दिवाळी व उन्हाळी सुट्टीचा गर्दीचा हंगाम वगळता वर्षभर सुरू राहणार आहे. या योजनेची सुरुवात १ जुलैपासून करण्यात आली आहे. तरी प्रवाशांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केले आहे.

१ जूनला एसटीच्या ७७ व्या वर्धापनदिनी परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी कमी गर्दीच्या हंगामामध्ये लांब पल्ल्याच्या बसमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी आगाऊ आरक्षण केल्यास त्यांच्या तिकीटामध्ये १५ टक्के सूट देण्यात येईल, अशी घोषणा केली होती. त्यानुसार ही योजना सर्व प्रकारच्या बससाठी १ जुलैपासून लागू करण्यात आली आहे. ही योजना पूर्ण तिकीट काढणाऱ्या प्रवाशांसाठीच लागू राहणार आहे.

येत्या आषाढी एकादशीला व गणपती उत्सवासाठी आगाऊ आरक्षण करणाऱ्या प्रवाशांना या योजनेचा लाभ घेता येऊ शकतो. राज्यभरातून पंढरपूर येथे जाणाऱ्या नियमित बसेसचे आरक्षण प्रवाशांनी केल्यास त्यांना त्यांच्या तिकीट दरात १५ टक्के सवलत १ जुलैपासून लागू करण्यात आली आहे. तथापि जादा बसेससाठी ही सवलत लागू असणार नाही. तसेच गणपती उत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या चाकरमानी प्रवाशांना देखील आगाऊ आरक्षण केल्यानंतर या तिकिटाचा लाभ घेता येऊ शकतो.

मुंबई- पुणे मार्गावर धावणाऱ्या एसटीच्या प्रतिष्ठित इ-शिवनेरी बसमधील पुर्ण तिकीट काढणाऱ्या प्रवाशांना या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घेता येईल.आगाऊ आरक्षण करणाऱ्या प्रवाशांनी प्रत्यक्ष तिकीट खिडकीवर, PUBLIC.MSRTCORS.COM या एसटीच्या अधिकृत संकेतस्थळावर अथवा MSRTC BUS RESERVATION या मोबाईल ॲपद्वारे तिकीट आरक्षित केल्यास त्यांना १५% सवलत प्राप्त करता येऊ शकते.

# आरोग्य उपकेंद्राच्या जागेचा प्रश्न निकाली

## प्रस्तावाला वनखात्याची मंजुरी; इमारत बांधकामास होणार प्रारंभ

**वाडा, दि. १ : प्रतिनिधी**

तालुक्यातील पीक ग्रामपंचायत हद्दीत आरोग्य उपकेंद्राच्या नवीन इमारत बांधकामाकरता शासनाने वर्षभरापूर्वी निधी मंजूर केला होता. मात्र, जागेअभावी हे बांधकाम रखडले होते. त्यामुळे ग्रामपंचायतीने वनविभागाकडे आरोग्य उपकेंद्राच्या बांधकामाकरता जमीन मिळावी म्हणून सादर केलेल्या प्रस्तावास अखेर मंजुरी मिळाल्याने आरोग्य उपकेंद्राच्या जागेचा प्रश्न मार्गी लागला आहे.

पालघर जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाकडून पीक येथे आरोग्य उपकेंद्राच्या नवीन इमारत बांधकामाकरता वर्षभरापूर्वी निधी मंजूर करण्यात आला होता. परंतु इमारत बांधकामाकरता आवश्यक जमिनीचे क्षेत्र आरोग्य विभागाकडे अथवा ग्रामपंचायतीकडे उपलब्ध नसल्याने हे बांधकाम मागील वर्षभरापासून रखडले होते. त्यामुळे पिक ग्रामपंचायतीने जव्हारच्या उप वनसंरक्षकांकडे वनहक्क कायद्यातील तरतुदींमधील ३/२ चा प्रस्ताव सादर करत सुमारे २० गुंठे क्षेत्र आरोग्य उपकेंद्राच्या बांधकामाकरता वर्ग करण्याची मागणी केली होती.

त्याकरता ग्रामपंचायतीचे सरपंच रविंद्र जोगवला यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. पीक परिसरातील जनतेला आरोग्य सुविधा मिळण्याच्या दृष्टीने ही आरोग्य उपकेंद्राची इमारत होणे आवश्यक असल्याचे पालघरचे खासदार डॉ. हेमंत सवरा व आमदार दौलत दरोडा यांनी तातडीने जमीन वळतीकरणाचा प्रस्ताव मंजूर करावा म्हणून वनविभागाच्या अधिकाऱ्यांना सूचना केल्या होत्या. त्यामुळे अखेर हा प्रस्ताव मंजूर झाल्याने आरोग्य विभागाच्या इमारत बांधकामाचा प्रश्न मार्गी लागला आहे. या आरोग्य उपकेंद्राचा सुमारे पाच हजारांहून अधिक लोकांना लाभ मिळणार आदिवासी, दुर्गम भागातील जनतेला असून आरोग्य सुविधा पुरवण्याला मदत होणार आहे.

# बनावट कागदपत्रांच्या आधारे सीमकार्डची विक्री

## नालासोपाऱ्यातील मोबाईल शॉपीतील धक्कादायक प्रकार

**वसई, दि. १ : प्रतिनिधी**

ग्राहकांच्या केवायसी कागदपत्रांचा गैरवापर करून विविध कंपन्यांची सिमकार्ड दुसऱ्या ग्राहकांना विकले जात धक्कादायक प्रकार उजेडात आला आहे. मीरा भाईंदर, वसई विरार पोलीस आयुक्तालयाच्या खंडणीविरोधी पथकाने याप्रकरणी दुकानमालकासह दोन जणांविरोधात काशिमीरा पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली आहे.

खंडणीविरोधी पथकाने मिळालेल्या माहितीवरून काशिमीरा येथील मुन्शी कंपाऊंडमधील ए. आर. पॅराडाईझ येथे मोबाईल सिमकार्ड विकण्यासाठी आलेल्या अनुज साळवी याला अटक केली. चौकशीत तो मोबाईल फोनमध्ये वापरत असलेल्या ग्राहकांच्या केवायसी कागदपत्रांच्या आधारे सिमकार्ड मिळवून ते रेहान खानला देत असे. नालासोपारा येथे राहणारा रेहान खान सदरची सिमकार्ड पूर्वेकडील प्रगतीनगर येथील जयमातादी इमारतीत असलेल्या इमारतीमधील मोबाईल शॉपीमध्ये ग्राहकांना विकून फसवणुक करत असल्याचे अनुजच्या अटकेनंतर उजेडात आले. खंडणीविरोधी पथकाने अधिक तपास करत आरोपींकडून दहा मोबाईल हस्तगत केले. तसेच आरोपींनी वीआय आणि एअरटेल कंपनीची सिमकार्ड विकल्याचेही उजेडात आले. याप्रकरणी काशिमीरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून रेहान खान आणि अनुज साळवीला अटक करण्यात आली आहे.

# वांद्री धरणात बुडून आणखी एकाचा मृत्यू

**मनोर, दि. १ : प्रतिनिधी**

मुंबईच्या जोगेश्वरी येथून महाविद्यालयीन मित्रांसोबत ट्रेकिंगसाठी पालघर तालुक्यातील गांजे गावाच्या हद्दीतील वांद्री धरण परिसरात आलेल्या युवकाचा बुडून मृत्यू झाला. अनिकेत रामतिरथ गुप्ता (२२) असे त्याचे नाव आहे. स्थानिकांच्या मदतीने त्याचा मृतदेह धरणाच्या पाण्यातून बाहेर काढण्यात आला. मुंबईतील जोगेश्वरी भागाचा रहिवाशी असलेला अनिकेत रामतिरथ गुप्ता (वय.२२) रविवारी ट्रेकींगला जात असल्याचे पालकांना सांगून त्याच्या महाविद्यालयीन मित्रांसोबत पालघर तालुक्यातील गांजे गावाच्या हद्दीतील वांद्री धरण परिसरात गेला होता. अनिकेत गुप्ता याला पोहता येत नसताना तो वांद्री धरणात मित्रांसोबत पोहण्यासाठी उतरला होता.दरम्यान धरणाच्या पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने त्याचा वांद्री धरणाच्या पाण्यात बुडुन मृत्यू झाला. अनिकेतच्या मित्रांनी मदतीसाठी आरडाओरडा केल्यानंतर स्थानिकांनी धाव घेत अनिकेतला पाण्यातून बाहेर काढले. परंतु नाकातोंडात पाणी गेल्याने त्याचा मृत्यू झाला होता. घटनास्थळी दाखल झालेल्या मनोर पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेतला. त्यानंतर शवविच्छेदनासाठी मृतदेह मनोरच्या ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आला होता. याप्रकरणी मनोर पोलीस ठाण्यात अपमृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# दोन अल्पवयीन बहिणी बेपत्ता

**भाईंदर, दि. १ : प्रतिनिधी**

भाईंदरमधील इंद्रलोक परिसरात राहणाऱ्या दोन अल्पवयीन सख्या बहिणी २७ जूनच्या संध्याकाळी बेपत्ता झाल्याप्रकरणी नवघर पोलीस ठाण्यात अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मेनुका वासुदेव कंडेल (१५) आणि सिर्जना वासुदेव कंडेल (१३) अशी त्यांची नावे आहेत. २७ जूनच्या संध्याकाळी साडेसहाच्या सुमारास यादोन्ही बहिणी राहत्या घरातून निघून गेल्या आहेत. त्यादोघी अल्पवयीन असल्याचा फायदा घेऊन त्यांचे अपहरण केले असल्याच्या संशयावरून अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पनवेलमधील डॉक्टरांचा ऋणानुबंध व डॉक्टर डे मोठ्या उत्साहात साजरा

**पनवेल, दि. १ : प्रतिनिधी**

दरवर्षीप्रमाणे यंदाही पनवेल डॉक्टर जनरल प्रॅक्टिशनर असोसिएशन च्या वतीने डॉक्टरांसाठी व त्यांच्या फॅमिली साठी ऋणानुबंध या कार्यक्रमाचे आयोजन छाया रिसॉर्ट मानघर येथे करण्यात आले होते.



प्रथमता पनवेल डॉक्टर जनरल प्रॅक्टिशनर असोसिएशनची सर्वसाधारण सभा च्या आयोजन करण्यात आले या सभेचे अध्यक्ष स्थान डॉ. मिलिंद टिपणीस यांनी भुषवले वेगवेगळया विषयावर चर्चा करून सर्व ठराव सर्वांग ते मंजूर करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटन संघटनेचे मार्गदर्शक डॉ. गिरीश गुणे सर आयसीटीसी चे डायरेक्टर डॉ. सलील पाटकर मिराकर हॉस्पिटलचे डायरेक्टर डॉ. राजेंद्र ढेरे केरला हॉस्पिटलचे मॅनेजिंग डायरेक्टर शुक्ला यांच्या उपस्थितीत करण्यात आली. मार्गदर्शक डॉ. गिरीश गुणे यांनी संघटनेबद्दल आज होणाऱ्या ऋणानुबंध कार्यक्रमाबद्दल थोडक्यात माहिती देऊन संघटनेला शुभेच्छा दिल्या त्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रम सिंगिंग डान्सिंग वन एकट प्ले सादरीकरण झाले यावेळेस दहावी बारावीच्या विद्यार्थ्यांचे सर्टिफिकेट तसेच सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात आले डॉक्टर वैभव मोकल यांनी आपल्या संघटनेबद्दल व तिच्या कार्याबद्दल थोडक्यात माहिती सर्व उपस्थित डॉक्टरांच्या फॅमिलीला सांगितली कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व बोर्ड व कोर कमिटी मेंबर्स यांनी खूप मेहनत घेतली होती आलेल्या सर्व डॉक्टरांचे व फॅमिली चे आभार डॉक्टर विवेक महाजन यांनी मानले.

# वसई मध्ये होणार विठूनामाचा गजर

**वसई, दि. १ : प्रतिनिधी**

आषाढीच्या निमित्ताने वारकऱ्यांची पाऊले सद्या वेगवेगळ्या पालख्यांबरोबर पंढरपूरच्या दिशेने पडत आहेत. जे पांडुरंगाचे भक्त पंढरपूरला जाऊ शकत नाहीत, अशांना दिंडी, पालखी सोहळा वसईमध्ये अनुभवता यावा यासाठी साहित्य जल्लोष प्रतिष्ठान आणि यंगस्टार ट्रस्ट दरवर्षी आषाढी निमित्ताने अभंगवाणी कार्यक्रमाचे आयोजन करत असते. यावेळी काढण्यात येणारी दिंडी आणि पालखी साऱ्यांचे लक्ष वेधून घेत असते. यावर्षी हा सोहळा वसई येथील क्रीडा मंडळाच्या सभागृहात आयोजित करण्यात आला आहे.


आषाढी एकादशी निमित्त " आषाढ घन सावळा " हा अभंगवाणी कार्यक्रम ६ जुलै २०२५ ला आयोजित करण्यात आला आहे. यावेळी संध्याकाळी ४ वाजता विठ्ठल नामाचा गजर करत वसईतील गुजराथी शाळेजवळील विठ्ठल रखुमाई मंदिरातून वारकरी दिंडी आणि पालखी निघणार आहे. ती क्रीडा भवन येथे पोहोचल्यानंतर सांयकाळी ५.३० वाजता क्रीडा भवनच्या आप्पा पेठे सभागृहात आषाढ घन सावळा हा अभंगवाणीचा कार्यक्रम सादर करण्यात येणार आहे. या कर्यक्रमात सारेगम फेम अभिषेक मारोतकर , सारेगम आणि सूर नवा धस नवा विजेता अनिरुद्ध जोशी, केतकी भावे -जोशी,आरजे अमित काकडे,लिटिल स्टार स्वानंदी केळवेकर आणि निर्माता दिगदर्शक योगेश केळवेकर सहभागी होणार आहेत. त्याचबरोबर दिंडीत बाल समाजोन्नती भजन मंडळ ,किरवली व मोरया महिला भजन मंडळ उमेळे हे सहभागी होणार आहेत. या वारकरी दिंडीत सगळयांनी पारंपरिक वेशभूषेत सहभागी व्हावे असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

# दिलीप धोडी सरपंचपदी रुजू

**बोईसर, दि. १ : प्रतिनिधी**

प्रकृती अस्वस्थामुळे महिनाभर रजेवर असलेले बोईसर ग्रामपंचायतीचे सरपंच दिलीप धोडी यांनी पुन्हा कार्यभार हाती घेतला. धोडी रजेवर गेल्यानंतर उपसरपंच नीलम संखे यांनी त्यांच्या अनुपस्थितीत प्रभारी सरपंच म्हणून जबाबदारी पार पाडली होती.

बोईसर ग्रामपंचायत पेसा ग्रामपंचायत असल्याने, उलगुलान ब्रिगेडचे अध्यक्ष अशोक शिंगाडा



यांनी गैर-आदिवासी सरपंचाच्या नियुक्तीवर आक्षेप नोंदवत जिल्हा परिषद आणि पंचायत समितीला पत्रव्यवहार केला होता. त्यामुळे मोठा वादंग माजला होता. आता प्रकृती सुधारल्यानंतर दिलीप धोडी यांनी पुन्हा सरपंचपदाची सूत्रे हाती घेतली आहेत. त्यामुळे हावादावर तूर्तास पडदा पडला आहे.

बोईसर हा आदिवासीबहुल भाग असूनही गैर आदिवासी सरपंचाच्या नियुक्तीमुळे निर्माण झालेल्या तणावानंतर हा निर्णय स्थानिक ग्रामस्थांसाठी दिलासादायक आहे. यापूर्वी अशोक शिंगाडा यांनी यासंदर्भात कायदेशीर कारवाईची मागणी केली होती. परंतु आता दिलीप धोडी यांच्या पुनरागमनामुळे ग्रामपंचायत प्रशासनाला स्थिरता येण्याची अपेक्षा आहे.

# बिल्डर वघासियायांकडून भागिदाराची 9 कोटींची फसवणूक

**भाईंदर, दि. १ : प्रतिनिधी**

अविघ्ना इन्फ्रा बिल्डकॉन या बांधकाम कंपनीत भागिदार असलेल्या अख्तर तसद्दुक खान यांची ९ कोटी रुपयांची फसवणुक केल्याप्रकरणी विनोद वेलजी वघासिया, प्रशांत विनोद वघासिया, निर्मला विनोद वघासिया आणि विद्या अशोक करकेरा याभागिदारांविरोधात काशिमीरा पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रारदार अख्तर खान अविघ्ना इन्फ्रा बिल्डकॉन यामीरा भाईंदर परिसरात बांधकाम व्यवसायात असलेल्या कंपनीत २५ टक्के भागिदार आहेत. याकंपनीने बांधलेल्या इमारतीमध्ये खान यांच्या हिस्साचे २५ फ्लॅट होते. सदरचे फ्लॅट विकून तक्रारदार खान यांना तीन कोटी रुपये देण्यात आले होते. तर उर्वरित ९ कोटी रुपये खान यांना अंधारात ठेऊन दुसरी कंपनी स्थापन करून त्यात वापरण्यात आले होते. तसेच भागिदारी कंपनीतील व्यवहार पूर्ण न करताच विनोद वेलजी वघासिया, प्रशांत वघासिया, निर्मला वघासिया आणि विद्या करकेरा यांनी बोगस कागदपत्रे तयार करून त्यावर खान यांची बनावट सही करून कंपनीतून त्यांना बेदखल करण्यात आले. त्यानंतर याच कंपनीची नोंदणी केल्याची तक्रार खान यांनी केली आहे.

खान भागिदार असलेल्या कंपनीच्या मालकीच्या जागेवर त्यातील फ्लॅटही विकून ग्राहकांची फसवणुक केल्याचीही खान यांची तक्रार आहे. त्यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

# महाराष्ट्र राज्य सफ़ाई कर्मचारी आयोगाने भिवंडी पालिका सफाई कर्मचाऱ्यांच्या समस्यांचा घेतला आढावा

**भिवंडी, दि. १ : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग रुक्कानसिंग डागोर यांनी गुरुवारी सायंकाळी भिवंडी महानगरपालिकेत आयोजित बैठकीत सफाई कर्मचाऱ्यांच्या समस्यांचा आढावा घेतला.या बैठकीस पालिका आयुक्त अनमोल सागर यांसह विविध अधिकारी कामगार संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.पालिका सफ़ाई कर्मचा-यांना सेवा सुविधा द्याव्यात तसेच त्यांच्या पदोन्नती बाबत सुचना देत सलग २५ वर्षे सेवा केलेल्या सफाई कर्मचाऱ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजनेंतर्गत मोफ़त



घर देण्यात यावे.तसेच जे कर्मचारी शासकीय वसाहतीत मागील ३५ वर्षापासून पिढ्यान पिढ्या एकाच घरात वास्तव्य करतात त्यांचे नावे पट्टा करावा अशा सूचना अध्यक्ष शेरसिंग डागोर यांनी केल्या.त्यासोबत सफाई कर्मचाऱ्यांना हातमोजे,तोंडावर मास्क,रेनकोट व इतर सुविधा पालिकेने उपलब्ध करून देण्यात याव्यात व कामगारांची वेळोवेळी वैद्यकीय तपासणी करून घ्यावी असे सांगितले.यावेळी आयुक्त अनमोल सागर यांनी पालिके कडून आरोग्य कर्मचा-यांना देण्यात येणा-या सेवा व योजनांचे सादरीकरण केले.यावेळी महाराष्ट्र राज्य सफ़ाई कर्मचारी आयोगा चे अध्यक्ष शेरसिंग डागोर यांनी पालिकेने केलेले सादरीकरण पाहुन समाधान व्यक्त केले. या बैठकीस अतिरीक्त आयुक्त विठ्ठल डाके,उपायुक्त (मुख्यालय) विक्रम दराडे, सहाय्यक आयुक्त (आरोग्य) शैलेश दोंदे,शहर अभियंता जमिल पटेल, मुख्य लेखा व वित्त अधिकारी रामप्रसाद सोळुंके,सहाय्यक आयुक्त (प्रशासन) अजित महाडीक, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, डॉ. संदिप गाडेकर, कर्मचारी संघटनेचे प्रतिनीधी व अन्य अधिकारी,कर्मचारी उपस्थित होते.

# परोपकारी ट्रस्टच्यावतीने भिवंडीत 200 विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वितरण



**भिवंडी, दि. १ : प्रतिनिधी**

परोपकारी ट्रस्टच्या माध्यमातून शहरातील पद्मानगर परिसरातील गरजू २०० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचा रेनकोट वितरण संस्थेचे पदाधिकारी मनोज दुधानी,राजू गाजंगी यांच्या शुभहस्ते करण्यात आले. याप्रसंगी परोपकारी संस्थेचे मध्यवर्ती समितीचे प्रमुख रामकिशोर दरक,सहसचिव रमेश मुंदडा, द्वारकाप्रसाद असावा,गजानन लोहिया,किशोर अग्रवाल,मुरली राठी, संजय कोठारी महावीर बियाणी ,बजरंग डागा, अखिल पद्मशाली समाजाचे अध्यक्ष रामकृष्ण पोटबत्तीनी,कार्याध्यक्ष मल्लेशाम कोंका,मोहन कोंडा आदी मान्यवर उपस्थित होते. शैक्षणिक साहित्यात शाळेची बॅग,पाणी बॉटल, जेवणाचा डब्बा व रेनकोट देण्यात आले.तर श्रीमती लक्ष्मीदेवी मोतीलाल तागडीया चॅरिटेबल ट्रस्ट च्यावतीने ५० गरजू विद्यार्थ्यांना प्रत्येकी २ हजार रुपयांची शैक्षणिक आर्थिक मदत करण्यात आली.

